# "माळेगाव यात्रा २०२५: कृषी विज्ञान केंद्र पोखर्णीच्या स्टॉलला शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद."

दक्षिण भारतातील प्रसिद्ध व प्राचीन असलेल्या लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र माळेगाव तालुका लोहा जिल्हा नांदेड येथील कृषी प्रदर्शनात दिनांक १८ ते २२ डिसेंबर २०२५ दरम्यान सहभागी झालेल्या कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेड-१ च्या स्टॉलचे मान्यवराच्या हस्ते उद्धाटन करण्यात आले, तसेच उपस्थित शेतकरी बांधवांना सविस्तर असे मार्गदर्शन शेतकरी -शास्त्रज्ञ संवाद अंतर्गत करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री आदरणीय श्री बाबासाहेब पाटील व लोहा कंधार चे आमदार, श्रीमान प्रतापराव पाटील चिखलीकर , जिल्हाधिकरी नांदेड, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रणिता ताई देवरे चिखलीकर , आकाशवाणी केंद्र नांदेड, लोकप्रतिनिधी, शेतकरी बांधव व महिला भगिनी, पत्रकार व व्यापारी बांधव, तरुण शेतकरी, गृहिणी, कृषी अधिकारी व कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी, शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक व वरिष्ठ नागरिकांनी  कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेडच्या स्टॉलला भेट देऊन कृषी विज्ञान केंद्र राबवीत असलेल्या विविध कृषी विस्तार कार्यक्रम, प्रशिक्षणे उपक्रम, योजनेची सविस्तर माहिती घेतली व स्टॉलवर उपस्थित असलेल्या कृषि विज्ञान केंद्र पोखर्णीचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. देविकांत देशमुख ( उद्यान विद्या) प्रा.माणिक कल्याणकर (पीक संरक्षण तज्ञ )डॉ. महेश अंबोरे ( पशु वैद्यक तज्ञ) प्रा. संदीप जायभाये ( कृषि विद्या तज्ञ) प्रा. सौं.अलका पवळे (गृह विज्ञान तज्ञ) व डॉ. सौं.अमिता क्षत्रिय (कृषि विस्तार तज्ञ) या सर्व शास्त्रज्ञाकडून विविध शंकेचे निरसन करून घेतले, यावेळी भेट दिलेल्या प्रत्येकांना कृषी विज्ञान केंद्राच्या विविध कृषी निविष्ठा निर्मिती विषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले तसेच कृषी विज्ञान केंद्राचे कर्मचारी श्री ए.जी भालेराव,श्री आर आर इंगोले,श्री आर.टी. वाडीले,श्री एस. एस. जाधव, सौ पी. एस. हाडोळतिकर, श्री एस.एस. गायकवाड, श्री एस.आर.कोणापुरे,श्री आर.जी.राऊत आणि संतोष वाघमारे यांचे देखील विशेष सहकार्य लाभले.

लोहा तालुक्यातील आदर्श गाव असलेल्या तळ्याची वाडी येथील २०० महिला बचत गट सदस्यांनी स्टॉलला भेट देऊन कृषी विज्ञान केंद्राकडून शेती व शेती पूरक जोडधंद्यावर प्रशिक्षण घेण्याची तयारी दर्शवली.


हार्दिक स्वागत
हरीश


कृषि विभाग जिल्हा परिषद, नांदेड
कै. डॉ. शंकरराव चव्हाण कृषिनिष्ठ शेतकरी सत्कार समारंभ
मा.खा.श्री.नागेश पाटील आष्टीकर
मा.आ.श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर
मा.आ.श्री.आनंदराव बोंढारकर
मा.आ.श्री.राजेश संभाजी पवार
मा.डॉ.श्री.निलकुमार ऐतवडे
२० डिसेंबर रोज शनिवार ९ वेळ : दुपारी ३.०० वाजता.


चना बीज
विक्की






विज्ञान केंद्र सगरोळी
ता.बिलोली जि.नांदेड
ICAR
Krishi Vigyan Kendra
Pokharni, Nanded-I (Ms)
कृषि विज्ञान केंद्र
दिनांक:
ठिकाण:


हार्दिक स्वागत




Krishi Vigyan Kendra
Pokharni,Nanded-1(Ms)
कृषि विज्ञान केंद


श्रीराम बायोसीड जेनेटिक्स
6001
हार्दिक स्वागत
विठ्ठल
हरीश

